**डोंगरी विभाग विकास कार्यक्रमांतर्गत**
**निश्चित केलेले डोंगरी क्षेत्र/ अनुज्ञेय**
**कामांबाबत मार्गदर्शक सूचना**

**महाराष्ट्र शासन,**
**नियोजन विभाग,**
**शासन निर्णय,क्रमांक-डोंविका-२००९/प्र.क्र.६/का.१४८३,**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**
**दिनांक - १८ जानेवारी, २०१०**

**वाचा :**

१) शासन निर्णय, नियोजन विभाग,क्रमांक-डोंविका-१०८८/प्र.क्र.५६/योजना-१९, दि.३.१०.१९८८,
२) शासन निर्णय, नियोजन विभाग,क्रमांक-डोंविका-१०८९/प्र.क्र.६६/योजना-१९, दि.२३.११.१९९०,
३) शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक -बीजीटी-१०९०/प्र.क्र.१०१/योजना-१९, दि.१०.४.१९९१,
४) शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक -डोविका-१०९०/प्र.क्र.१२० /योजना-१९, दि.६.११.१९९१,
५) शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक -बीजीटी-१०९२/प्र.क्र.५९ /योजना-१९, दि.१३.७.१९९२,
६) शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक -डोंविका-१०९२/प्र.क्र.८५/योजना-१९, दि.२७.११.१९९२,
७) शासन निर्णय,नियोजन विभाग क्रमांक-डोविका-१०९३/प्र.क्र.७६/योजना-१९, दि. १४.७. १९९३,
८) शासन निर्णय,नियोजन विभाग क्रमांक-डोविका-१०९३/प्र.क्र.९६/योजना-१९, दि. १६.९. १९९३,
९) शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक -डोविका-१०९३/प्र.क्र.६६ /योजना-१९, दि.२७.१०.१९९३,
१०)शासन निर्णय नियोजन विभाग क्रमांक - डोविका- १०९३ / प्र.क्र.९६/ योजना-१९ , दि. १९.१.१९९४,
११) शासन निर्णय,नियोजन विभाग क्रमांक-डोविका-१०९३/प्र.क्र.७६/योजना-१९, दि. २९.१. १९९४,
१२) शासन निर्णय,नियोजन विभाग क्रमांक-डोविका-१०९४/सं.क्र.९६/योजना-१९, दि.९ .३. १९९४,
१३) शासन निर्णय,नियोजन विभाग क्रमांक-डोविका-१०९४/सं.क्र.९६/योजना-१९, दि.१३ .६. १९९४,
१४) शासन निर्णय, नियोजन विभाग,क्रमांक-डोंविका-१०९४/प्र.क्र.३६/का.१४५५,दि. २७.९. १९९४,
१५) शासन निर्णय,नियोजन विभाग क्रमांक-डोविका-१०९३/प्र.क्र.९६/कार्या.१४५५ दि. १६.११.१९९४,
१६) शासन निर्णय,नियोजन विभाग क्रमांक-डोविका-१०९३/प्र.क्र.७६/योजना-१९, दि.२८ .३. १९९५,
१७) शासन निर्णय, नियोजन विभाग,क्रमांक-डोंविका-१०९४/प्र.क्र.३६/का.१४५५, दि. २९.३ १९९५,
१८) शासन निर्णय,नियोजन विभाग क्रमांक-डोविका-१०९५/प्र.क्र.६४/का.१४५५ दि.१९.३.१९९६,
१९) शासन निर्णय,नियोजन विभाग क्रमांक-डोविका-१०९८/प्र.क्र.२०/का.१४५५ दि.१८.७.१९९८,
२०) शासन निर्णय, नियोजन विभाग,क्रमांक-डोंविका-१०९८/प्र.क्र.३८/का.१४५५,दि. ४.१०. १९९८,
२१) शासन निर्णय, नियोजन विभाग,क्रमांक-डोंविका-१०९९/प्र.क्र.२९/का.१४५५, दि.१६.१२.१९९९,
२२) शासन निर्णय, नियोजन विभाग,क्रमांक-डोंविका-१०९९/प्र.क्र.६४/का.१४५५, दि.२४ .७.२०००,
२३) शासन निर्णय,नियोजन विभाग क्रमांक-डोविका-१०२०००/प्र.क्र.४५/का.१४५५, दि.२४.७. २०००,
२४) शासन निर्णय,नियोजन विभाग क्रमांक-डोंविका-१०८९/प्र.क्र.१८/योजना-१९, दि.१८ .८. २०००,
२५) शासन निर्णय,नियोजन विभाग क्रमांक- डोंविका-१००२/प्र.क्र.९८/का.१४५५, दि. २१.१२.२००२,
२६) शासन निर्णय, नियोजन विभाग,क्रमांक-डोंविका-१००२/प्र.क्र.३०/का.१४५५, दि. १३ .६. २००३,
२७) शासन निर्णय,नियोजन विभाग क्रमांक-डोविका-१००३/प्र.क्र.१४२/का.१४५५ दि.२९.१२.२००४,
२८) शासन निर्णय,नियोजन विभाग क्रमांक- डोंविका-१००५/प्र.क्र.१२३/का.१४५५, दि. २४.२.२००६,
२९) शासन निर्णय,नियोजन विभाग क्रमांक- डोंविका-२००६/प्र.क्र.१०५/का.१४५५, दि. - ६.२.२००७,
३०) शासन निर्णय,नियोजन विभाग क्रमांक- डोंविका-२००७/प्र.क्र.६५/का.१४५५, दि. १.९.२००७,
३१) शासन परिपत्रक,नियोजन विभाग क्रमांक- डोंविका-२००७/प्र.क्र.९४/का.१४५५, दि. १४.१२.२००७,
३२) शासन परिपत्रक,नियोजन विभाग क्रमांक- डोंविका-२००७/प्र.क्र.५४/का.१४५५, दि. २०.२.२००८,
३३) शासन निर्णय,नियोजन विभाग क्रमांक- डोंविका-२००८/प्र.क्र.११६/का.१४५५, दि. १०.३.२००८,

३४) शासन  निर्णय,नियोजन विभाग क्रमांक- डोंविका-२००७/प्र.क्र.९५/का.१४५५, दि. १५.५.२००८,
३५) शासन परिपत्रक, नियोजन विभाग क्रमांक- डोंविका-२००८/प्र.क्र.९१/का.१४५५, दि. २४.१०.२००८,
३६)  शासन निर्णय,नियोजन विभाग क्रमांक- डोंविका-२००८/प्र.क्र.८९/का.१४५५, दि. १०.११.२००८,
३७) शासन निर्णय, नियोजन विभाग,क्रमांक-डोंविका-२००९/प्र.क्र.१/का.१४५५, दि.२३.१.२००९,
३८) शासन शुध्दीपत्रक,  नियोजन विभाग क्रमांक-डोंविका-२००९/प्र.क्र.४२/का.१४८३/दि.२७ .७.२००९,
३९) शासन पत्र क्र. बीजीटी २००९/प्र.क्र.२८/का.१४८३, दि.१८.७.२००९, ५.८.२००९ व १३.८.२००९.

**प्रस्तावना :-**

राज्यातील सर्व विभागांचा समतोल विकास व्हावा असे शासनाचे धोरण आहे व त्यादृष्टीने राज्याच्या पंचवार्षिक / वार्षिक योजनांची आखणी करण्यात येते.  हे करीत असताना डोंगरी विभागाच्या काही विशिष्ट गरजा असल्याचे आढळून आले.  डोंगरी विभागांचा विकास करण्यासाठी या भागाचे प्रश्न समजून घेण्याच्या उद्देशाने तसेच राज्यातील डोंगरी विभागाचे क्षेत्र विशिष्ट निकषांच्या आधारे निश्चित करुन त्यांच्या विकासासाठी खास कार्यक्रम घेण्याच्या हेतूने शासनाने ऑक्टोबर, १९८८ मध्ये तत्कालीन मा. मंत्री (ग्राम विकास) यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाची एक उपसमिती नेमली होती.  सदर समितीने ऑगस्ट, १९८९ मध्ये शासनास अहवाल सादर केला होता.

२.  मंत्रिमंडळ उपसमितीच्या शिफारशीनुसार व मंत्रिमंडळाच्या मान्यतेनंतर निकषांच्या आधारे डोंगराळ विभागाचे क्षेत्र प्रथमतः २३ नोव्हेंबर, १९९० च्या शासन निर्णयान्वये घोषित करण्यात आले. त्याचवेळी असाही निर्णय घेण्यात आला की, डोंगरी क्षेत्र म्हणून घोषित केलेल्या गावांच्या यादीमध्ये आणखी एखाद्या दुसऱ्या गावाचा समावेश करण्याची मागणी पुढे आल्यास त्याबाबत जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख यांचेकडून प्रस्तावाची छाननी करुन याबाबतचा निर्णय घेण्यात येईल. त्यानुसार नवीन डोंगरी क्षेत्र जाहीर करण्याच्या मागण्यांच्या संदर्भात जमाबंदी आयुक्तांकडून निकषनिहाय अहवाल मागविण्यात येत होते.

३.  दरम्यान रिमोट सेंन्सिग या अत्याधुनिक व प्रगत तंत्रज्ञानाच्या सहाय्याने उपग्रहामार्फत प्राप्त होणाऱ्या पृथ्वीच्या छायाचित्रांचे विश्लेषण करणाऱ्या महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र, नागपूर यांचेकडून वरील निकषनिहाय डोंगरी क्षेत्राचे अहवाल मागविण्यात येऊ लागले.  तथापि, दोन्ही यंत्रणांकडून येणाऱ्या अहवालामध्ये काही तफावती असल्याचे आढळून आल्या.  तेव्हा महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र, नागपूर यांचेकडून प्राप्त होणारे अहवाल अत्याधुनिक व प्रगत तंत्रज्ञानाच्या आधारे आणि उपग्रहामार्फत प्राप्त होणा-या माहितीच्या आधारे  तयार होत असल्याने यापुढे या यंत्रणेकडूनच अहवाल मागवून गावांचा/तालुक्यांचा डोंगरी विभाग क्षेत्रात समावेश करण्याचा निर्णय शासनाने दि.२९ मार्च, १९९५ च्या शासन निर्णयान्वये घेतला आहे.

४.  नियोजन विभागाच्या संदर्भाधिन क्रमांक २, १४, २२ व २६ येथील शासन निर्णयान्वये घोषित केल्यानुसार सद्यःस्थितीत राज्याच्या २१ जिल्हयातील ७३ "पूर्णगट डोंगरी तालुके" व ३५ "उपगट डोंगरी तालुके" म्हणून डोंगरी विभाग विकास कार्यक्रमात समाविष्ट करण्यात आलेले आहेत.  या कार्यक्रमांतर्गत नवीन गावांचा व कामांचा समावेश करण्याबाबत लोकप्रतिनिधी/ जिल्हाधिकारी यांचेकडून विनंती करण्यात येत होती. या सर्व बाबींचा विचार करुन संदर्भाधीन शासन निर्णय/परिपत्रक/शुध्दीपत्रक/पत्रे वेळोवेळी निर्गमित करण्यात आली आहेत. डोंगरी विभाग विकास कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी व अधिकारी / कर्मचारी / लोकप्रतिनिधी यांच्या सोयीसाठी सर्वसमावेशक आदेश असणे आवश्यक आहे. यासाठी या पूर्वीचे सर्व शासन निर्णय/परिपत्रक/शुध्दीपत्रक/पत्रे अधिक्रमित/रद्दबातल करणे आवश्यक आहे. तसेच संविधानाच्या ७४ व्या घटना दुरुस्तीतील अनुच्छेद २४३ झेड डी नुसार स्थापन करण्यात आलेल्या जिल्हा नियोजन समितीच्या रचनेस अनुसरून योग्य संनियंत्रणासाठी डोंगरी विभाग विकास कार्यक्रमाच्या आराखडयास मान्यता देण्यासाठी स्वतंत्र

समिती न ठेवता सदरचा आराखडासुध्दा नियमीत जिल्हा नियोजन समितीसमोर ठेवणे आवश्यक आहे. वाढलेले बाजारभाव लक्षात घेता डोंगरी विकास कार्यक्रमांतर्गत एका कामासाठी असलेली रुपये १० लाखाची मर्यादा वाढविण्याची गरज, सर्व शिक्षा अभियानात अनेक शालेय शिक्षण विषयक योजना असल्याने या कार्यक्रमातील या संबंधीच्या योजनांत थोडाफार बदल करणे, या बाबीचा विचार करून एकत्रीत व सुधारित शासन निर्गमित करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

## शासन निर्णय :

१. डोंगरी विभाग विकास कार्यक्रमासंदर्भात आतापर्यंत निर्गमित केलेल्या संदर्भाधीन सर्व शासन निर्णय /परिपत्रक/शुध्दीपत्रक/पत्रे अधिक्रमित/रद्दबातल करुन हा सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे. डोंगरी विभाग विकास कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसंबंधी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

**डोंगरी विभागाचे निकष**

२. राज्यातील डोंगरी विभागाचे क्षेत्र मंत्रिमंडळ उपसमितीच्या शिफारशींनुसार व मंत्रिमंडळाच्या मान्यतेनंतर विशिष्ट निकषांच्या आधारे निश्चित केले आहे. एखाद्या भौगोलिक भागास डोंगरी भाग समजण्यासाठी खालील अटी पूर्ण होणे आवश्यक आहे:-

(अ) त्या क्षेत्राचा सरासरी उतार ३० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त आणि तसेच सापेक्ष उंची ३०० मीटरहून जास्त असणे आवश्यक आहे. (प्रमुख डोंगरी भाग)

(ब) त्याखेरीज प्रमुख डोंगरी भागाचा भौगोलिक विस्तार हा १७% ते ३०% उतार असल्यास. (अंशतः डोंगरी क्षेत्र )

(क) मात्र, वरील "अ" व "ब" येथील अटी पूर्ण करणाऱ्या डोंगरी भागाचे किमान क्षेत्रफळ १०० चौ.कि.मी. असणे आवश्यक आहे.

जर एखाद्या तालुक्यात वरील अटी पूर्ण करणाऱ्या डोंगरी भागाचे क्षेत्रफळ किमान १०० चौ.कि.मी. किंवा त्यापेक्षा जास्त असून अशा डोंगरी भागाचे क्षेत्रफळ तालुक्याच्या भौगोलिक क्षेत्रफळाच्या ५०% किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास तो पूर्ण तालुका डोंगरी विभाग/ पूर्णगट डोंगरी तालुका समजण्यात येईल. तसेच जर एखाद्या तालुक्यात वरील अटी पूर्ण करणाऱ्या डोंगरी भागाचे क्षेत्रफळ किमान १०० चौ.कि.मी. असून अशा डोंगरी भागाचे क्षेत्रफळ तालुक्याच्या भौगोलिक क्षेत्रफळाच्या २०% पेक्षा जास्त परंतु ५०% पेक्षा कमी असल्यास तो तालुका उपगट डोंगरी तालुका समजण्यात येईल. पूर्णगट तालुक्यामध्ये तालुक्यातील सर्व गावांचा समावेश होतो तर उपगट तालुक्यामध्ये डोंगरी क्षेत्रात येणाऱ्या गावांचाच समावेश होतो.

**डोंगरी विभागात समाविष्ट क्षेत्र व अनुज्ञेय निधी**

३. या निकषानुसार २१ जिल्हयातील ७३ पूर्णगट डोंगरी तालुके व ३५ उपगट डोंगरी तालुके असे डोंगरी विभागाचे क्षेत्र घोषित करण्यात आले आहे त्याची यादी **परिशिष्ट-१** मध्ये देण्यात आली आहे. ३५ उपगट डोंगरी तालुक्यातील जी गांवे डोंगरी विभागाच्या क्षेत्रामध्ये समाविष्ट आहेत त्या गावांची नावे **परिशिष्ट-२** मध्ये देण्यात आली आहेत**.** डोंगरी विभाग विकास कार्यक्रमांतर्गत प्रत्येक पूर्णगट डोंगरी तालुक्यास दरवर्षी रु.६०.०० लाख व प्रत्येक उपगट डोंगरी तालुक्यास रु.३०.०० लाख या प्रमाणे निधी देय आहे.

**डोंगरी विभाग विकास कार्यक्रमातर्गत अनुज्ञेय कामे**

४. डोंगरी विभाग विकास कार्यक्रमाच्या निधीमधुन घ्यावयाच्या अनुज्ञेय कामांची यादी **परिशिष्ट-३** मध्ये दिली आहे. या कार्यक्रमांतर्गत घेण्यात येणाऱ्या कामाबाबत खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

अ) या कार्यक्रमांतर्गत घेण्यात येणारी कामे एक ते दोन वर्षात पूर्ण होणारी असावीत.

ब) या कार्यक्रमांतर्गत घेण्यात येणाऱ्या कामांचा अंदाजीत खर्च रू १५ लाखापेक्षा जास्त नसावा.

क) या कार्यक्रमांतर्गत घेण्यात येणाऱ्या कामांची/योजनांची निवड करताना ज्या प्रकारची कामे / योजना जिल्हा योजनेतून घेता येतात अशीचे कामे/योजना या निधीतून घेण्यात यावीत.

ड) या कार्यक्रमाखाली नविन कामे घेताना प्रथमतः अपुर्ण कामांसाठी पुर्णपणे तरतुद करण्यात आली आहे याची खातरजमा करून नंतरच उर्वरीत निधीतून नविन कामे घ्यावीत.

इ) डोंगरी विभागासाठी काही योजनांसाठी संबंधीत विभागांनी शिथील केलेले मापदंड वगळता अन्य नियमीत योजनेसाठी/ कामासाठी जे निकष,नियम,मर्यादा,धोरण,कार्यपध्दती इ. लागू असतील ते सर्व या कार्यक्रमाखालील योजनेसाठी/ कामासाठी लागू राहतील.

फ) डोंगरी क्षेत्रासाठी नियमित योजनेतून मिळणा-या निधीखेरीज अतिरीक्त कामे घेता यावीत म्हणून स्वतंत्र निधी देण्यात येत आहे. या बाबीचा विचार करता या भागसाठी नियमीत योजनेतून कामे घेवून उर्वरीत कामे या निधीतून घेण्यात यावीत.

ग) या कार्यक्रमाखाली खाजगी/सहकारी संस्थांची कामे घेण्यात येवू नयेंत.

ह) या कार्यक्रमांतर्गत करण्यात आलेल्या तरतुदी त्या भागातच खर्च होतील हे पहावे. एखाद्या विकास क्षेत्राखालील तरतूद काही अपरिहार्य परिस्थितीत खर्च होणार नसेल तर ती दुसऱ्या विकास क्षेत्रासाठी वापरता येईल, परंतु कोणत्याही परिस्थितीत ती तरतूद त्या जिल्हयाच्या डोंगरी विभागातच वापरावी लागेल.

**राखीव निधी**

५. डोंगरी विकास कार्यक्रमांतर्गत एकूण तरतुदीच्या २५ % तरतूद अंगणवाडी बांधकाम या योजनेंसाठी खर्च करावी. अंगणवाडी बांधकामांची आवश्यकता नाही किंवा तेथे तसा वाव नाही, ही बाब जिल्हास्तरावरील संबंधित विभाग प्रमुखाने प्रमाणित केल्यास यासाठीचा २५ % राखीव निधी जिल्हा नियोजन समितीच्या सल्ल्याने इतर अनुज्ञेय कामावर / योजनांवर खर्च करता येईल.

**डोंगरी विभाग विकास कार्यक्रमाचा आराखडा व मंजुरी**

६. जिल्हाधिकारी यांनी डोंगरी विकास कार्यक्रमांतर्गत घेण्यात येणाऱ्या कामांचे प्रस्ताव संबंधित प्रशासकीय विभाग / कार्यान्वयीन यंत्रणा / लोकप्रतिनिधी यांचेकडून मागवावेत. प्राप्त झालेल्या प्रस्तावांचा विचार करुन विहित नियतव्ययाच्या मर्यादेत डोंगरी विकास कार्यक्रमांचा स्वतंत्र आराखडा तयार करावा. महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (रचना व कामे) अधिनियम १९९८ अन्वये राज्यामध्ये सर्व जिल्ह्यात जिल्हा नियोजन समितीची स्थापना झालेली आहे. डोंगरी विकास कार्यक्रमाच्या योग्य संनियंत्रण व अंमलबजावणीसाठी या कार्यक्रमासाठी वेगळी समिती असणे योग्य राहणार नाही. सबब डोंगरी विकास कार्यक्रमाच्या आराखड्यास उपरोक्त नियमित जिल्हा नियोजन समितीचीच मंजुरी घेण्यात यावी. जी कामे या कार्यक्रमांतर्गत मार्गदर्शक

सूचनांनुसार अनुज्ञेय नाहीत, परंतु जिल्हा नियोजन समितीने ती कामे करण्याबाबत निर्णय घेतला असेल तर नियोजन विभागाच्या पूर्व मान्यतेने आराखडयात समाविष्ट करावी.

**कामांना प्रशासकीय मान्यता**

७. डोंगरी विकास कार्यक्रमाखाली घेण्यात येणाऱ्या कामांना/योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याचें अधिकार जिल्हाधिकारी यांना असतील. प्रशासकीय मान्यता देताना त्यासंबंधित प्रशासकीय विभागाने निश्चित केलेले निकष व मार्गदर्शक तत्वे विचारात घ्यावेत. तसेच अशा कामांना प्रशासकीय मंजुरी देताना जिल्हाधिकारी यांनी नियंत्रक अधिकारी म्हणून मंजूर यादीतील कामे शासनाच्या आदेशाप्रमाणे व मार्गदर्शक सूचनांप्रमाणे आहेत किंवा कसे याची खातरजमा करुन घ्यावी व नंतरच कामांना प्रशासकीय मंजुरी द्यावी. एखाद्या कामास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याची आवश्यकता भासल्यास जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत विहित केलेल्या पद्धतीप्रमाणे कार्यवाही करावी.

**कामांना तांत्रिक मान्यता/निविदा मागविणे**

८. या कार्यक्रमाखाली घेण्यात येणाऱ्या कामांना/योजनांना तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार संबंधीत प्रशासकीय विभागास असतील. कामासाठी निविदा काढणेसाठी विहित पध्दतीचा अवलंब करावा.

**नियंत्रक अधिकारी**

९. या निधीतून होणाऱ्या खर्चासाठी संबंधित जिल्हाधिकारी हे नियंत्रक अधिकारी (कंट्रोलिंग) असतील. या कार्यक्रमासाठीचा निधी अर्थसंकल्पात केल्यानंतर विहीत पध्दतीने वितरित करण्यात येईल. या कार्यक्रमावर होणाऱ्या खर्चाचा हिशोब स्वतंत्रपणे ठेवण्यात यावा व यासाठी योग्य अशी लेखापध्दती अवलंबण्यात यावी.

**योजनेची अंमलबजावणी व संनियंत्रण**

१०. अ) जिल्हाधिकारी यांनी या योजनेअंतर्गतच्या कामांचे संनियंत्रण करावयाचे आहे. तसेच कामे विहित वेळेत पूर्ण होण्यासाठी सर्व त्या उपाययोजना करावयाच्या आहेत.

ब) शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार निधी खर्च करण्यामध्ये काही अडचणी असल्यास जिल्हाधिकारी यांनी त्या शासनाच्या निदर्शनास आणाव्यात.

क) प्रशासकीय व तांत्रिक मान्यता दिल्यानंतर कामाचा वेग, दर्जा व त्यास अनुषंगिक अन्य बाबी इ.बाबत काही समस्या निर्माण झाल्यास त्याबाबतची कार्यवाही संबंधित कार्यान्वयीन यंत्रणा व त्यांच्या संबंधित प्रशासकीय विभाग यांनी करावयाची आहे.

ड) या कार्यक्रमांतर्गत घेण्यात येणाऱ्या योजना / कामांचे अहवाल संबंधित कार्यान्वयीन यंत्रणांनी जिल्हाधिकारी यांना दरमहा ५ तारखेपर्यंत सादर करावेत. जिल्हाधिकारी यांनी एकत्रित अहवाल विहित प्रपत्रात शासनास दरमहा १० तारखेपूर्वी सादर करावेत.

इ) या कार्यक्रमांतर्गत प्राप्त झालेल्या तरतुदीपैकी पूर्ण तरतूद खर्च होईल किंवा कसे याचा अंदाज कार्यान्वयीन यंत्रणेने घ्यावा. निधी खर्च होणार नसेल तर अखर्चित राहणारा निधी समर्पित करण्याचा प्रस्ताव कार्यान्वयीन यंत्रणेने ५ मार्चपर्यंत जिल्हाधिकारी यांना पाठवावा. जिल्हाधिकारी यांनी सदरची बचत अन्य योजनांसाठी वळती करण्याची कार्यवाही करावी. जिल्हाधिकारी यांनी निधी अखर्चित राहत असल्यास समर्पित

करावयाच्या निधीचा प्रस्ताव १० मार्चपर्यंत शासनास सादर करावा. विहित वेळेत निधी समर्पित न केल्यास संबंधित अधिकारी जबाबदार राहतील.

फ) निधी अर्थसंकल्पित करणे व वितरित करणे ही बाब वगळता विधानमंडळाशी संबंधित अन्य बाबी संबंधित प्रशासकीय विभागांनी हाताळावयाच्या आहेत.

११. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१००१२११६५२३९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( सु. ना. शिंदे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) राज्यपालांचे सचिव,
२) मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३) सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
४) शासनाचे मुख्य सचिव,
५) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
६) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
७) सर्व विभागीय आयुक्त,
८ ) महालेखापाल १/२ , (लेखा व अनुज्ञेयता ), महाराष्ट्र , मुंबई/नागपूर ,
९ ) महालेखापाल १/२, (लेखा परिक्षा), महाराष्ट्र , मुंबई/नागपूर,
१०) सर्व जिल्हाधिकारी,,
११) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१२) सर्व विशेष कार्य अधिकारी (नियोजन), विभागीय आयुक्तांचे कार्यालय,
१३) सर्व जिल्हा नियोजन अधिकारी ,
१४) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१५) निवड नस्ती, (का. १४८३)

## परिशिष्ट - ३

(शासन निर्णय, नियोजन विभाग क्र.डोंविका-२००९/प्र.क्र.६/का.१४८३, दि. १८ जानेवारी, २०१०)

**डोंगरी विभाग विकास कार्यक्रमांतर्गत नियोजन विभागामार्फत वितरीत करण्यात येणा-या विशेष निधीमधून घ्यावयाच्या अनुज्ञेय कामांची यादी.**

**(१) प्राथमिक शिक्षण**

(अ) शासकीय प्राथमिक शाळांच्या नवीन खोल्यांचे बांधकाम व दुरुस्ती.

(ब) शासकीय प्राथमिक शाळांची दुरुस्ती.

**(२) पाटबंधाऱ्यांची कामे**

(अ) कोल्हापूर पध्दतीचे बंधारे

(ब) लघु-पाटबंधारेची कामे

(क) उपसा जलसिंचन योजना

**(३) रस्ते विकासाची कामे**

(अ) लहान रस्ते (खडी करण)

(ब) मिसिंग लिंक

(क) छोटे पूल

(ड) ३ कि.मि. लांबीच्या रस्त्यांचे डांबरीकरण (सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रमाणकानुसार)

(इ) नळकांडी पूल

(ई) साकव

(प) रस्त्यावरील मोरीची कामे.

(फ) लहान नाल्यावर फरशी बांधणे

(ब) फूटब्रीज

**(४) पाणी पुरवठयाची कामे (ग्राम विकास विभागाच्या प्रमाणकानुसार)**

(अ) ग्रामीण पाणी पुरवठयाच्या लहान लहान योजना

(ब) ज्या गावातील नळपाणी पुरवठा योजना आगोदरच झाल्या असतील अशा गावातील वाडयांसाठी जादा पाईपलाईन टाकून वाडयांना पाणी पुरवठा करण्यासंबंधीची कामे.

(क)गावासाठी /वाडयासाठी विंधन विहिरी.

**(५)समाज मंदिरे**

**(६) सामाजिक सभागृहे**

**(७) उपसा जलसंचिन योजना व त्याच्या दुरुस्त्या**

**(८) एस.टी. निवारा (पिकअप शेड)**

**(९) अंगणवाडीसाठी इमारतीचे बांधकाम.**

**(१०) सौर ऊर्जेवरील दिवे**

**(११) विद्युत विकासाची कामे**

**परिशिष्ट-१**(शासन निर्णय, नियोजन विभाग क्र.डोंविका-२००९/प्र.क्र.६/का.१४८३,दि. १८ जानेवारी, २०१०)

**राज्यातील डोंगरी विभागाचे क्षेत्र दर्शविणारे विवरणपत्र**

| अ.क्र | जिल्हा | डोंगरी तालुका | पूर्ण गट | उप गट |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | ठाणे | १) मोखाडा<br>२) शहापूर<br>३) जव्हार<br>४) वाडा<br>५) मुरबाड<br>६) वसई<br>७) भिवंडी | पूर्ण गट (१)<br>पूर्ण गट (२)<br>पूर्ण गट (३)<br>पूर्ण गट (४)<br>पूर्ण गट (५) | <br><br><br><br><br>उप गट (१)<br>उप गट (२) |
| | एकूण | | ५ | २ |
| २ | रायगड | ८) तळा<br>९) खालापूर<br>१०) महाड<br>११) पोलादपूर<br>१२) रोहा<br>१३) सुधागड<br>१४) म्हसाळा<br>१५) पेण<br>१६) मुरुड<br>१७)कर्जत<br>१८) माणगांव<br>१९) पनवेल | पूर्ण गट (६)<br>पूर्ण गट (७)<br>पूर्ण गट (८)<br>पूर्ण गट (९)<br>पूर्ण गट(१०)<br>पूर्ण गट (११)<br>पूर्ण गट(१२)<br>पूर्ण गट(१३)<br>पूर्ण गट(१४)<br>पूर्ण गट (१५)<br>पूर्ण गट (१६) | <br><br><br><br><br><br><br><br><br><br><br>उप गट (३) |
| | एकूण | | ११ | १ |
| ३ | रत्नागिरी | २०) संगमेश्वर<br>२१) चिपळूण<br>२२) लांजा<br>२३) खेड<br>२४) राजापूर<br>२५) मंडणगड | पूर्ण गट (१७)<br>पूर्ण गट (१८)<br>पूर्ण गट (१९)<br>पूर्ण गट (२०)<br>पूर्ण गट (२१) | <br><br><br><br><br>उप गट (४) |
| | एकूण | | ५ | १ |
| ४ | सिंधुदूर्ग | २६) कुडाळ<br>२७) कणकवली<br>२८) वैभववाडी<br>२९) सावंतवाडी<br>३०) देवगड<br>३१) मालवण | पूर्ण गट (२२)<br>पूर्ण गट (२३)<br>पूर्ण गट (२४)<br>पूर्ण गट (२५)<br>पूर्ण गट (२६) | <br><br><br><br><br>उप गट ( ५) |
| | एकूण | | ५ | १ |
| ५ | नाशिक | ३२) सुरगणा<br>३३) कळवण<br>३४) पेठ | पूर्ण गट (२७)<br>पूर्ण गट (२८)<br>पूर्ण गट (२९) | |

| अ.क्र | जिल्हा | डोंगरी तालुका | पूर्ण गट | उप गट |
|---|---|---|---|---|
| | | ३५) इगतपूरी<br>३६)बागलाण<br>३७)सिन्नर<br>३८)नाशिक<br>३९) दिंडोरी | <br>पूर्ण गट (३०)<br>पूर्ण गट (३१)<br>पूर्ण गट (३२)<br>पूर्ण गट (३३)<br>पूर्ण गट (३४) | |
| | एकूण | | ८ | ० |
| ६ | धुळे | ४०) शिरपूर<br>४१) साक्री | पूर्ण गट (३५)<br>पूर्ण गट (३६) | |
| | एकूण | | २ | ० |
| ७ | नंदूरबार | ४२) अक्राणी<br>४३) अक्कलकुवा<br>४४) नवापूर<br>४५) तळोदा<br>४६) शहादा | पूर्ण गट (३७)<br>पूर्ण गट (३८)<br>पूर्ण गट (३९) | <br><br><br>उप गट (६)<br>उप गट (७) |
| | एकूण | | ३ | २ |
| ८ | जळगांव | ४७) यावल<br>४८) रावेर<br>४९) चोपडा<br>५०) एदलाबाद | | उप गट (८)<br>उप गट (९)<br>उप गट (१०)<br>उप गट (११) |
| | एकूण | | ० | ४ |
| ९ | अहमदनगर | ५१) अकोले<br>५२) संगमनेर<br>५३) अहमदनगर<br>५४) पारनेर<br>५५) पाथर्डी | पूर्ण गट (४०)<br>पूर्ण गट (४१) | <br><br>उप गट (१२)<br>उप गट (१३)<br>उप गट (१४) |
| | एकूण | | २ | ३ |
| १० | पुणे | ५६) खेड<br>५७) आंबेगांव<br>५८) मुळशी<br>५९) भोर<br>६०) मावळ<br>६१) पुरंदर (सासवड)<br>६२) वेल्हे<br>६३) जुन्नर<br>६४) हवेली | पूर्ण गट (४२)<br>पूर्ण गट (४३)<br>पूर्ण गट (४४)<br>पूर्ण गट (४५)<br>पूर्ण गट (४६)<br>पूर्ण गट (४७)<br>पूर्ण गट (४८)<br>पूर्ण गट (४९<br>पूर्ण गट (५०) | |
| | एकूण | | ९ | ० |
| ११ | सांगली | ६५) शिराळा<br>६६) खानापूर<br>६७) कडेगांव | पूर्ण गट (५१) | <br>उप गट (१५)<br>उप गट (१६) |
| | एकूण | | १ | २ |
| १२ | सातारा | ६८) जावळी<br>६९) महाबळेश्वर<br>७०) पाटण<br>७१) सातारा<br>७२) वाई | पूर्ण गट (५२)<br>पूर्ण गट (५३)<br>पूर्ण गट (५४)<br>पुर्ण गट (५५)<br>पूर्ण गट (५६) | |

| अ.क्र | जिल्हा | डोंगरी तालुका | पूर्ण गट | उप गट |
|---|---|---|---|---|
| | | ७३) कोरेगांव<br>७४) खटाव<br>७५) खंडाळा<br>७६) माण<br>७७) फलटण<br>७८) कराड | पूर्ण गट (५७)<br>पूर्ण गट (५८)<br>पूर्ण गट (५९) | उप गट (१७)<br>उप गट (१८)<br>उप गट (१९) |
| | एकूण | | ८ | ३ |
| १३ | कोल्हापूर | ७९) शाहुवाडी<br>८०) गगनबावडा<br>८१) राधानगरी<br>८२) भुदरगड<br>८३) पन्हाळा<br>८४) करवीर<br>८५) कागल<br>८६) चंदगड<br>८७) आजरा<br>८८) गडहिंग्लज | पूर्ण गट (६०)<br>पूर्ण गट (६१)<br>पूर्ण गट (६२)<br>पूर्ण गट (६३)<br>पूर्ण गट (६४)<br>पूर्ण गट (६५)<br>पूर्ण गट (६६)<br>पूर्ण गट (६७)<br>पूर्ण गट (६८)<br>पूर्ण गट (६९) | |
| | एकूण | | १० | ० |
| १४ | औरंगाबाद | ८९) सोयगांव<br>९०) सिल्लोड<br>९१) खुलताबाद<br>९२) कन्नड | पूर्ण गट (७०) | उप गट (२०)<br>उप गट (२१)<br>उप गट (२२) |
| | एकूण | | १ | ३ |
| १५ | बीड | ९३)आष्टी<br>९४)पाटोदा<br>९५)परळी<br>९६)केज<br>९७)बीड<br>९८) आंबेजोगाई<br>९९) धारुर | | उप गट (२३)<br>उपगट (२४)<br>उप गट (२५)<br>उप गट (२६)<br>उप गट (२७)<br>उप गट (२८)<br>उप गट (२९) |
| | एकूण | | ० | ७ |
| १६ | हिंगोली | १००)हिंगोली<br>१०१)कळमनुरी | | उप गट (३०)<br>उप गट (३१) |
| | एकूण | | ० | २ |
| १७ | नांदेड | १०२) किनवट | पूर्ण गट (७१) | |
| | एकूण | | १ | ० |
| १८ | बुलढाणा | १०३) संग्रामपूर | | उप गट (३२) |
| | एकूण | | ० | १ |
| १९ | अकोला | १०४)पातूर | | उप गट(३३) |
| | एकूण | | ० | १ |
| २० | अमरावती | १०५) चिखलदरा<br>१०६) धारणी | पूर्ण गट (७२)<br>पूर्ण गट (७३) | |
| | एकूण | | २ | ० |
| २१ | यवतमाळ | १०७)पुसद<br>१०८)उमरखेड | | उप गट (३४)<br>उप गट (३५) |
| | एकूण | | ० | २ |

| अ.क्र | जिल्हा | डोंगरी तालुका | पूर्ण गट | उप गट |
|---|---|---|---|---|
| एकूण २१ जिल्हे | | | ७३ | ३५ |

## परिशिष्ट - २

(शासन निर्णय, नियोजन विभाग क्र.डोंविका-२००९/प्र.क्र.६/का.१४८३,दि. १८ जानेवारी, २०१०)

## डोंगरी तालुक्यातील गावांची यादी

| अ. क्र. | जिल्हा | उपगट तालुका | उपगट तालुक्यातील गावांची नांवे |
|---|---|---|---|
| | | **कोकण विभाग** | |
| **१.** | **ठाणे** | **१) वसई** | १) चांदीप २) तिपलीया ३) शिवनसई ४) पानसा ५) उसगांवश ६)परोळ ७) शिरवली ८) जळकीया ९) सायवन १०) घाटेघर ११)भावखल १२) पेल्हार १३) माजिवली १४) देपिवली १५) करझोण १६) खानिवंडे १७) भिन्नार १८) खोलसट १९) खैरपाडा २०) सुंदरा २१) बुडाल २२) तिल्हेर २३) सावट २४) गुरतारी २५) बिलालपाडा २६) गया २७) दडविरा २८) सातीवली २९) खर्डी ३०) दैडा ३१)डोलीव ३२) बामन ३३) काजू ३४) कोल्ही ३५) कोळा ३६)चिंचोटी ३७) होबाऊन |
| | | **२) भिवंडी** | १) गणेशपुरी २) वडवली ३) उसगांव ४) घोडगांव ५) आंबीपाडा ६)घोटाडे ७) मोहिली ८) बाबचा ९) मालादियोर १०) देपोली ११)उसपाडी पाडा १२) आंबराईपाडा १३) ध्यार १४) खडकी खुर्द १५)पिंपळवेल १६) खडकी बुद्रुक १७) भाउपोळ १८) गुहापाडा १९)कुहा २०)आंबापाडा २१) देपपाडा २२) माजरपाडा २३) धामणे २४) वरणापाडा २५) पेंडरीपाडा २६) नवावाडा २७) थाऊरपाडा २८)धुलईपाडा २९)पायगांव ३०) पाया ३१)खर्डीपाडा ३२) पैरुनपाडा ३३) भावाडीपाडा ३४) खारबांव ३५)गाणे ३६)लाखिवली ३७)चिंबीपाडा ३८)गौरीपाडा३९)डोकरनापाडा४०)अलकोअरी |
| **२.** | **रायगड** | **३) पनवेल** | १) माणिकघर २) थीडसावना ३) सावना ४) बामणोरी ५) जामदेवी ६) देवलोळी ७) छावना ८) कालेवली ९) सारसाई १०) आपटा ११)कासप १२) कारडा १३) देवटी १४) गुलसुंडा १५) अकुब्रडी १६)थुराडाव १७) वावेधर १८) कोष्टी १९) दापोवली २०) देवतुली २१) सावला २२) करनाडा २३) कला २४) बंडाना २५) कारल २६)दुलघट २७) कातरभाट २८) दिघारी २९) हातवंडी |
| **३.** | **रत्नागिरी** | **४) मंडणगड** | १) आंबवणे बुद्रुक २) किंजळघर ३) पेवे ४) पणदेरी ५) पडवे ६)उंबरशेत ७) वेरळ तर्फे वैश्वी ८) तेर्डी ९) लोकरण १०) म्हाप्रळ ११) अडखळनंव १२) कुंभार्ली १३) गोवळे १४) पन्हळी खुर्द १५) बुरी १६) टाकवली १७) टांगर १८) सुर्ली १९) आडरवल २०) वेश्वी २१)पाट २२)शेनाळे २३) सोवेली तर्फे वेश्वी २४) कुडूकखुर्द २५)शिरगांव २६) धुत्रोली २७) सडे २८) तळेघर २९) टाकेड ३०)पाचरळ ३१) धामणी ३२) बोरखत ३३) गोटे ३४) भामधर ३५)सावरी ३६) निगडी |
| **४.** | **सिंधुदूर्ग** | **५) मालवण** | १) कुलोस २) असरुंडी ३) भवानी ४) वंजकर ५) टाटारभाव ६)भाटपावणी ७) मिरवडे ८) राटीवडे ९) आजगणी १०) ब्राम्हण ११)हिवाळे १२) आवलीचे १३) खोटले १४) हेडूल १५) वायंनगावडे |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | १६) वायरन १७) पोईप १८) नेसुरे १९) वाडेच्या पाट २०) नवापाट २१) गोलवण २२) डिकवळ २३) चापेखोल २४) कुमामे २५) नांदोस २६) तिरावडे २७) पारस २८) हेडूल |
| | | **नाशिक विभाग** | |
| **५.** | **नंदूरबार** | **६) तळोदा** | १) सोजूरवाडा २) माळखुर्द ३) चोगांव खुर्द ४) लाकूड शेट ५) खर्डी खुर्द ६) काठोर ७) बंधारा ८) खडी बुद्रुक ९) जुवाणी १०) लाखापूर ११) माळ १२) मोरामाळ १३) आंबा गव्हाण १४) सीतपावळी १५)बामनी १६) मलुवा १७) राजापूर |
| | | **७) शहादा** | १) काकरद खुर्द २) कनकरदे बुद्रुक ३) कोंढावळ ४) चांदसेली ५)चिरडे ६) वरुड बुद्रुक ७) मळगांव ८) भुलाना ९) दरा १०) राणीपूर ११) आकसपूर १२) मानमोडया १३) नागझरी १४) लंगडी भवसनी १५) शहाना १६) खापरखेडे १७) आमाणपूर खुर्द १८)टरबा १९)नायगांव २०) सिसुरा २१) पेटा २२) फोफराळे २३) चांदपूर २४)गुदा २५) इकरास २६) काटघर २७) पिरपूर |
| **६.** | **जळगांव** | **८) यावल** | १) मनुबाई देवस्थान २) लंगडया आंबा ३) गटू्न्या ४) जामन्या ५)उसमळी ६) हरीपूरा ७) नागदेवी ८) वाघझीर ९) आसरा बारी |
| | | **९) रावेर** | १) तिडया २) अंधारमळी ३) मोहमोडी ४) चिंचाटी ५)निमडया ६)गारखेडा ७)मोहमांडली सून ८) पिंपट कुंड ९) पाल १०) मोरव्हाल ११) जिन्ती १२) गारखेडी १३) सहस्नलिंग १४) लालमाती |
| | | **१०) चोपडा** | १) मराठा २) सत्रासेन ३) खांडरा ४) भोरचिडा ५) उमरटी ६)गोयापाडा ७) कृष्णापूर ८) खा-यापाडा ९) विजापूर १०) मुढयावतार ११) शेतपाणी १२) बोरअनंती १३)मालापूर १४) विष्णापूर १५)बोरमळी १६) कर्जाणा १७) मेलाना १८) देव्हारी |
| | | **११)एदलाबाद** | १) दुई २) सुकली ३) सोमणगांव ४) डोलरखेडा ५) नोंदवेल ६)वायल ७) चारठाणे ८)देवी मंदीर ९) मारझिरा १०) जोधन खेडा ११)लालगोडा १२) हुलखेडा |
| **७.** | **अहमदनगर** | **१२)अहमदनगर** | १)आगडगांव २) देवगांव ३) रतडगांव ४) बारदरी ५)मेहकरी ६)माळेवाडी ७) माथणी ८)रांजणी ९)खांडके १०)पिंपळगावकवडा ११) भोयरेखुर्द १२)कौडेगांव १३)सोनेवाडी १४)पिंपळगांव १५)उजनी १६) भोपरेपठार. |
| | | **१३)पारनेर** | १) चिंचोली २) शेरी-कोलदरा ३) दरोडी ४) नांदुरपठार ५)सावरगांव ६)कारेगांव ७) निखोल ८) पांडळी-दर्या ९)जाधववाडी १०)शहाजापूर. |
| | | **१४) पाथर्डी** | १)चेकेवाडी २)माणिकदौंडी ३)पिरेवाडी ४)बोरसेवाडी ५)आलहणवाडी ६)मोहरी ७)करोडी ८)चिचंपूर-पांगुळ ९)ढाकणवाडी |
| | | **पुणे विभाग** | |
| **८.** | **सांगली** | **१५)खानापूर** | १)देविखिंडी २)रेणावी ३)वारुंबे ४)कुर्ली ५)पारे |
| | | **१६)कडेगांव** | १)कोतवडे २)सोनसळे ३) सिरसगांव ४)सोनकिर |
| **९.** | **सातारा** | **१७) माण** | १) कुळकजाई २) कळसकर वाडी ३) गाडेवाडी ४) शिंदी बुद्रुक ५)पाळवण ६) तोंडले ७) उगळेवाडी ८) खंडयाची वाडी ९) मोगराळे १०) शिंगणापूर ११) भाडळी १२) इंजलात १३) कळपोंडी १४) विरळी १५) वळई १६) कुक्कडवाड १७) मखणे १८) काळेवाडी १९) दोरगे वाडी २०) किरकसाड २१) महिमानगड २२) दिवडी २३) पांढरवाडी २४) स्वरुपवानवाडी २५) उकिरडे २६) शिंदी बुद्रुक २७) बोंधे |

| | | | |
|---|---|---|---|
| | | **१८)फलटण** | १) सालपे २) आदर्कीखुर्द ३) आळजापूर ४) कोराळे ५) वाघोशी ६)लाथवडा ७)मानेवाडी ८) झडकषाईवाडी ९) वेलोशी १०) उपलवे ११) दाववडी १२) मीरेवाडी १३) गिरवी १४) धुमाळवाडी १५)बेडकेवाडी १६) सासकळ १७) भाडळी खुर्दे १८) दुधेभावी १९) मीरदे २०) जावली २१) आद्रुड २२) कुरवाली बु. |
| | | **१९) कराड** | १) मरळी २) चोरजवाडी ३) कोरीवळे ४) बेलदरे ५) म्होप्रे ६)भोळेवाडी ७) साकुडी ८) येणके ९) कोळे १०) कुसुर ११) तुळसण १२) सवादे १३) लाटकेवाडी १४) हवेलवाडी १५) म्हसोळी १६)शेवाळेवाडी १७) शेळकेवाडी १८) मनू १९) येवती २०)घराळवाडी २१) हणमंतवाडी २२) टाळगांव २३) येळगांव २४) गोरेवाडी २५)गणेशवाडी २६) भरेवाडी २७) साळशिरमे २८) महारुगडेवाडी २९) जीती ३०) अक्काईवाडी ३१)कासारशिरभे ३२) निगडी ३३)घोलपवाडी ३४) किवळ ३५) खेडताईवाडी ३६) मसूर ३७)हणबरवाडी ३८) वाण्याची वाडी ३९) मालवाडी ४०) कांबीरवाडी ४१) शिरगांव ४२) सुळी ४३) पाल ४४) हरपळवाडी ४५) रिसवड ४६) वरती साकुर्डी ४७) सांजूर ४८) तांबवे ४९) आरेवाडी ५०)गमेवाडी ५१) माळवाडी ५२) डोळेवाडी ५३) पांढरवाडी ५४)आणे ५५) अंबवडे ५६) तारुख ५७) वामन वाडी ५८)वानरवाडी ५९) उंडाळे ६०) भूरभूशी ६१) जखीनवाडी ६२)नांदलापूर ६३) वनवासमाची ६४) वसंतगड ६५) चरेगांव ६६)भवानपाडा ६७)शितलवाडी ६८) चिरवली ६९) पाचुंद ७०)कामथी ७१) वाघेरी ७२) करवडी ७३) हजारमाची ७४)वावरमाची ७५) वनवासमाची ७६) राजमाची ७७) टेंभू ७८)भयापूर ७९) कोरेगांव ८०) कार्वे ८१)वडगांव हवलेली ८२)शेणोली कालवडे ८३) घोगांव |
| **औरंगाबाद विभाग** | | | |
| **१०.** | **औरंगाबाद** | **२०) सिल्लोड** | १) धनशिंगवाडी २) बाभुळगांव ३) पोखरी ४) बाबरा ५) मोमोनाबाद ६)लेहा ७)बोधेगांव बु. ८) अंधारी ९) जातवा १०) उमरावती ११)घाटनांदा १२) परदेशीवाडी १३) चारनेर १४) थावडा १५)अंधारवाडी १६) कडेगांव १७) सिरसाम १८) नातेगांव १९)घाटमखळ २०) हालदा २१) पिंपळदरी २२) मुखवार २३) वाघरा २४) रांजणी २५) अजिंठा २६) अनाड २७) आमसरी २८) नारवी २९) वडाळी |
| | | **२१) खुलताबाद** | १) वडगांव २) पाडळी ३) शिरोळ ४) सावरखेडा ५) लोणी ६) बोडक ७) खुलताबाद ८) धामणगांव ९) अबदुलापूर १०) निरगुही बु. ११)पिंपरी १२) जमालवाडाी १३) म्हैसमाळ १४) शिरसमाळ १५)टाकळी खुर्द १६) आखतवाड १७) वेरुळ १८) मंत्रापूर १९)खुलताबाद २०) सराई २१) बादलाबाई २२) नंद्रबाद २३)मापसाळा २४) रसुलपूर २५) शंकरपूरवाडी २६) साबुखेडा २७) खिर्डी २८)सोनखेडा २९) भटजी ३०) लामनगांव ३१) खतेनापूर ३२)विरमगांव |
| | | **२२) कन्नड** | १) तांदुळवाडी २) पेवली ३) मुंगसापूर ४) पेकडवाडी ५) कोंडवाडी ६) कल्याणी ७) वडनेर ८) अंबाला ९) आंबा १०) जामडी ११) रेळ १२) कुंजखेड १३) नांदगिरवाडी १४)हिवरुखेडा १५) वडाळी |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | १६)जैतखेडा १७) मालेगांव ढोकळ १८) भारंबा १९) मालेगांव लोखंडे २०) मोहाडी २१) हस्ता २२) माहेगांव २३) देवूपूर २४) पळशी खुर्द २५) काळंबी मांजरा २६) भिलदरी २७) गोर पिंपरी २८) सवखेडा बु. २९) पिंपरखेडा ३०) सफीयाबाद ३१) खडकी ३२) पिशोर ३३)खातखेडा ३४) वासडी ३५) निंभोरा ३६) उमरखेड ३७)सावरगांव ३८) धामणी ३९) आंबेगांव बु. ४०) मेहुण ४१) हासेवाडी ४२)वडगांव ४३) लोझा ४४) पांगेरी ४५) बेलखेडा ४६) सोनवाडी ४७) शिवघाट ४८) चिमणापूर ४९) नागापूर ५०) करंजखेड ५१)रेडळगांव ५२) नेवूपूर ५३) घाटशेंदा ५४) टाकळी अंतूर ५५)लोहगांव ५६) नायगांव ५७)तपोवन ५८) कान्हेगांव ५९) हिवरा ६०) दुधमाळ६१) तळनेर ६२) वडोद ६३) मोहर्डा ६४)वजीर वाडी (मोहर्डा गावाखालील वाडी) |
| **११.** | **बीड** | **२३) आष्टी** | १) देऊळगाव घाट २)चिंचवाडी ३)आरणविहिर ४)कारखेलखुर्द ५)वेलतुरी ६)शेंडाळे ७)मसुबाची वाडी ८) महिंद्र ९) पांग्रा १०)पिंपरी (नजीक घाट ) |
| | | **२४) पाटोदा** | १) निरगुडी २) वडझरी ३) रोहतवाडी ४) डोमरी |
| | | **२५) परळी (वैजनाथ)** | १) सरफराजपूर २) गर्देवाडी ३) कऱ्हेवाडी ४) मोहा ५) बोधेगांव ६)सोनहिवरा ७) अस्वलंबा ८) वानटाकळी ९)दौनापूर १०) डाभो ११)इदबवाडी १२) कनेरवाडी १३) भोपला १४) देवाडा. |
| | | **२६) केज** | १) तळनेरी २)नागझरी ३) जिवाची वाडी ४) धाटेवाडी ५) तूळूची वाडी ६) कोरडयाची वाडी ७) गौरवाडी ८) पराची वाडी |
| | | **२७) बीड** | १)हिवरा-पहाडी २) बोरखेडी ३) वांगी ४) कोल्हारवाडी ५) अहेरवाडी ६)करझणी ७) धनगरवाडी ८)चराटा ९)मेंगळेवाडी १०) जाधववाडी ११)नागझरी १२) पाटोदा १३)(बेलवंडी) कचारवाडी १४) खंडाळा |
| | | **२८) आंबेजोगाई** | १)चिंचखंडी २) राक्षसवाडी ३)ममदापूर ( परळी )४) एल्डा ५)मांडवा ( पठाण ) ६)काळवटी ( लमानतांडा ) ७)साकूड ८)अंबलवाडी |
| | | **२९) धारुर** | १)चिखलबीड २)खडकी ३)टोकवाडी ४)पिंपळा ५)मैदवाडी ६)चोरांबा ७)मोहा (जहागीर) ८)काटेवाडी ९)भोगलवाडी १०)मोहखेड ११)आमला १२) कोयाड. |
| **१२.** | **हिंगोली** | **३०) हिंगोली** | १) नरसी २) लोहगां ३) सेवली ४) पिंपळा ५) बोरळा ६) जळगांव ७)शेलेगांव ८)सोनेगांव ९) पिंपरखेड १०) देवळा ११) अनपनवाडी १२) सुकापूर १३) माथा १४) मुर्लिजापूर १५) केहरपिंपरी १६)सिध्देश्वर १७)दिधुळ १८) दुडचुना १९) बडचुन २०) आढी २१) हनुमानदरी २२)शिवकार २३) जामला २४) जामदन २५)वैजापूर २६) खंबाळा २७) फासेले २८) तबलीगव्हाण २९) मांडेगांव ३०) राख ३१)जामरी-खुर्द ३२)पांगरी ३३) बोराळा ३४)नांदुरा ३५) कडवी ३६)आमनखेड ३७) ब्रम्हपुरी ३८) खळगांव ३९) जामसन ४०) पारडी ४१) खळगांव ४२) रिधोस ४३) सेजगांव ४४) कोळंब ४५) सुकली बु. ४६) सुकली खु. ४७) शिंदेफळ ४८)धनगरवाडी ४९) सबळखेड ५०) बाभुळगांव ५१) गोरेगांव ५२) पोंडीखुर्द ५३) ब्राम्हणवाडी ५४)पिंपरी पाथवळ ५५) बोरखेड ५६)एकंबा ५७) खंडळा ५८)चिंचोळी ५९) बेलुरा ६०) आडगांव ६१) देवठाण ६२) काळेगांव ६३) कलीखेड ६४) कळपकुर्ली ६५) चाटोना ६६) देवठाण |
| | | **३१) कळमनुरी** | १) खेरडा २) धानापूर ३) धोतरा ४) अमरखोजा ५) शिरसखुर्द |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ६)शिरस बु. ७)डिग्रसवापी ८) पिंपळी ९) सांडस १०) रेटकर ११)वराडी १२) खडकत बु. १३) खडकत खु. १४) मंदारी १५)गारखेडा १६) महारी खु.१७) खडकेत १८) बैज १९) दुधेरी २०)चिंचोळी २१)खोडतला २२) पेडगांव २३) डोंगी २४) नांदुरा २५) बोलावाडी २६) तळेगांव २७) जांब २८) निमते बु २९) कापर ३०) शिपगी ३१)माळवाडी ३२) दाडेगांव ३३) मोंतीचोर ३४) विठ्ठलवाडी ३५)पिंपरी खु. ३६) कानेगांव ३७) फाटाणा ३८) दाभाडी ३९) पुंचा ४०) मारेगांव |
| **१३.** | **बुलढाणा** | **३२) खामगांव** | १) गिरोळ २) इसालवाडी ३) चिंचखेडनाथ ४) कडेडगांव ५)चिंचखेडबंड ६) शेंद्री ७)मांडणी ८) बोधा ९) खेर्डी १०) वाकी ११)गारवेड १२) गारोडी १३) थार १४) माटरगांव १५) चिंचखेड १६)सारोळा १७) कोन्टी १८) वझर १९) पिंपरीधनगर २०)लाखनवाडी-खुर्द २१) फत्तेपूर २२) निमखेडा २३) लाखनवाडी बुद्रुक २४)हिवरेखेड २५) निरोडा |
| **१४.** | **अकोला** | **३३) पातूर** | १) अंबारी २) भानोसा ३) बेलतळ ४) मलकापूर ५) भांकद कंदोली ६) बडीआमराई ७) बोडसा ८) खानापूर ९) काकडदरी १०) कोठारी बुद्रुक ११) पासटल १२) कोसगांव १३) माळराजुरा १४) सावरखेड १५) चिंचखेड पातूर १६) शेकापूर १७) कार्ला १८) चारमुळी १९)धरम २०) पांदुर्जा २१) सोनुना २२) चिखलवाव्हळ २३) चौंडी २४) जांब २५) चिंचखेड २६) गोळेगांव २७) आधारसावंगी २८) गावडगांव २९)सावरगांव |
| **१५.** | **यवतमाळ** | **३४) पुसद** | १) पिंपळगांव २) हौसापूर ३) बामनवाडी ४) का-होळ ५) गहुळी ६)चौंडी ७) चिंचघाट ८) देवगव्हाण ९) बेलगव्हाण १०) जामनीधुंदी ११) मोरगड १२) उडवी १३) पारवा १४) पांदुणी (खुर्द) १५) खटकोला १६) पन्हाळा १७) मांजरवजळा(खुर्द) १८) मांजरजवळा(बु) १९)सावतमाळ २०) हनवंतखेड २१) मारवाडी २२) अमृतनगर २३)धनसळ २४) अनसळ२५) उपवनवाडी २६) रामपूरनगर २७)दुधगिरी २८)अनसिंग २९)जांबनाईकर ३०)शिलोना |
| | | **३५) उमरखेड** | १) दिडाळा २) पार्डी ३) पिरंजी ४) गोविंदपूर ५) कुरळी ६) जाम ७)अकोली ८) साताळा ९) मसळग १०) पार्डी ११) जेवळी १२)पिंपळगांव १३) बोडखा १४) पेंधा १५) उदापूर १६) सावरगांव १७) परोटी खुर्द १८) नानी १९) बोरी २०) थेरडी २१) पवनाळा २२)सोनदाभी २३) येकंबा २४) मोरचंडी २५) कोसंबी २६) चिखली २७) रोमपूर २८) बोरगांव २९) डोंगर गांव ३०) धडोली ३१) सोईर ३२) नवेलालपूर ३३) दिग्रस ३४)काओ ३५) कवठा ३६)दहेली ३७)धानोरा ३८) शिवाजीनगर ३९) जवराळा ४०) उमरी ४१)कसोली ४२) सेवालालनगर ४३) वडगांव ४४) दामसरी ४५) थार बु. ४६)सेरंडी ४७) दरारी ४८) मधुरानगर |